संख्या २००७
पान ११



अंतरिच्या उमाळ्यांत

(३)

आता आभास सावरी
दूर जाणाऱ्या त्या वाटा
माझे वल्हे तोलतील
किती तुफानांशी लाटा

अखेरीला काय होती
जमेसाठी उरणार ?
तुझ्या विरक्त क्षणांना
हृदयांत जपणार !

सख्या दोष नाही तुझा
नियतीचे पानपान
पतिव्रता सीतेठाई
घडले रे रामायण ...

सती सावित्री, अहिल्या
इथे जडशीळ झाल्या
उर्मिलेच्या व्यथा जिथे
फक्त अश्रूतून न्हाल्या ...

तिथे माझे काय गुण
दुणावल्या भावनांत

भोग भोगणार मीही
अंतरीच्या उमाळ्यांत.

०००० 

१४.२.७९

सहदेव मखामले
तळेगांव, दाभाडे ४१०५०६.